





म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
क्र.

# कथासरित्सागर

## महामति वररुचि

प्र. शं. जोशी



# महामति वररुचि

22802
609

प. शं. जोशी

IRBK-0106278

५० नये पैसे

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड,
३, राउंड बिल्डिंग, काळबादेवी रस्ता, मुंबई २

# कथानकाची भूमिका

बृहत्कथेच्या पहिल्या लंबकांत सुरुवातीलाच वररुचीची कथा दिली आहे. कात्यायन ऊर्फ वररुचि हा इ. स. पूर्व ४ थ्या शतकांतील प्रसिद्ध वैयाकरण होऊन गेला. त्याच्या अलौकिक बुद्धिमत्तेबद्दल ज्या अनेक दंतकथा प्रचलित होत्या, त्यांची चांगल्या तऱ्हेनें सांगड घालून, बृहत्कथेंतील हें कथानक रचलेलें दिसतें. वररुचीचें चारित्र लिहितांना मूळ लेखकानें ऐतिहासिक दृष्टिकोण मुळींच बाळगला नाहीं. भिन्न भिन्न शतकांत जन्मलेल्या पाणिनि, व्याडी व वररुचि या सर्वांनीं वर्षाचार्यांकडून एकाच वेळीं विद्या संपादन केली, असें विधान या कथेंत आहे. एवढेंच नव्हे तर त्याला या कथेंत चंद्रगुप्त मौर्याचा प्रधान-मंत्रीहि केलें आहे. त्याचप्रमाणें 'पैशाची' हा एक प्राकृत भाषेचा प्रकार आहे. तरीदेखील 'पैशाची' भाषेचा पिशाच शब्दाशीं बादरायण संबंध जोडून, काणभूति नांवाच्या पिशाचाचा कथानकांत संबंध आणला आहे ! अधूनमधून उपकथानकेंहि दिलीं आहेत. पण एक काल्पित कथा या दृष्टीनें पाहतां ती अत्यंत वेधक व आकर्षक वाटेल यांत संशय नाहीं.

— अनुवादक

# महामति वररुचि

★

## पार्वतीचा पुष्पदंतास शाप

पौर्णिमेची रात्र होती ती. चंद्र आकाशांत बराच वर आला होता. कैलासाचीं शुभ्र शिखरें चंद्रप्रकाशांत न्हाऊन निवत होतीं. अशा वेळीं कैलासाच्या एका शांत शिखरावर, शंकर पार्वतीसह बसले होते. पार्वतीला एखादी छानशी गोष्ट ऐकण्याची इच्छा झाली. तिनें खूप खूप मोठी आणि मजेदार अशी गोष्ट सांगण्याची शंकरांना विनंती केली. शंकर भोळे असले तरी थट्टेखोर होते. " ठीक आहे " असें म्हणून ते गंभीर होऊन सांगूं लागले. " एक होता प्रजापति. त्याचें नांव दक्ष. त्याला अनेक मुली होत्या. ... " पण शंकरांना पुढें बोलूं न देतां पार्वती रागानें म्हणाली, " पुरे झाली ही तुमची गोष्ट. माझ्याच पूर्वजन्मींची कथा मला सांगतां ना ? तें कांहीं नाहीं ! आतांपर्यंत कुणींहि न ऐकलेली अपूर्व गोष्ट मला ऐकायची आहे. तुम्ही सांगणार नसाल तर मी तुमच्याशीं बोलणारच नाहीं. " असें म्हणून ती रागानें गुरंफटून बसली. तेव्हां शंकरांनीं तिला गोष्ट सांगायला सुरुवात केली.

त्याच वेळीं शंकरांचा पुष्पदंत नांवाचा एक सेवक त्यांच्या भेटीला निघाला होता. नंदीनें त्याला वाटेंतच अडविलें. कारण " कोणालाहि वर सोडूं नको " असें पार्वतीनें नंदीला बजावून सांगितलें होतें. पुष्पदंतानें नंदीला परोपरीनें विनाविलें पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. तेव्हां योगसामर्थ्यानें पुष्पदंत गुप्त झाला व त्यानें शिखरावर प्रवेश मिळविला. अदृश्यरूपानेंच तो तेथें राहिला व शंकरांनीं पार्वतीला सांगितलेल्या सात विद्याधरांचें अपूर्व चरित्र त्यानें ऐकलें. घरीं येऊन त्यानें तें जयेला सांगितलें. जया ही त्याची पत्नी असून, ती कैलासावर द्वारपालिकेचें

काम करीत असे. तिच्या तोंडीं ती गोष्ट कुठली राहायला ? तिनें तें चरित्र जसेंच्या तसें पार्वतीला सांगितलें.

तें ऐकून पार्वती रागानें फणकारत शंकरांकडे आली व म्हणाली, " महाराज ! तुम्हीं मला चांगलेंच फसविलें ! तुम्हीं सांगितलेली गोष्ट अपूर्व आहे असा मी विश्वास ठेवला. पण ती गोष्ट आपल्या जयेलासुद्धां माहीत आहे. तिनें ती आतांच मला सांगितली." पार्वतीचें हें बोलणें ऐकून शंकरांनाहि आश्चर्य वाटलें. कारण पार्वतीशिवाय ती गोष्ट पूर्वी त्यांनीं कुणालाच सांगितली नव्हती. त्यांनीं समाधि लावली व सर्व गोष्टीचा छडा लावला. ते पार्वतीला म्हणाले, " अदृश्य होऊन पुष्पदंत येथें आला व त्यानें ती गोष्ट ऐकली. नंतर घरीं जाऊन त्यानें ती जयेला सांगितली." हें ऐकून पार्वतीनें पुष्पदंताला बोलावून घेतलें व " तूं मृत्युलोकांत जन्माला येशील " असा शाप दिला. माल्यवान् नांवाचा त्याचा मित्र त्याच्या-साठीं रदबदली करूं लागला, तेव्हां पार्वतीनें त्यालाहि तोच शाप दिला. शेवटीं पुष्पदंत, माल्यवान् व जया या तिघांनींहि पार्वतीची प्रार्थना केली; तेव्हां ती शांत होऊन म्हणाली, " पुष्पदंता ! तूं ही गोष्ट विंध्या-रण्यामधील काणभूति नांवाच्या पिशाचाला सांग म्हणजे तुझी शापांतून मुक्तता होईल. काणभूतीनें ही गोष्ट माल्यवानाला सांगितल्यावर ते दोघेहि शापमुक्त होतील." असें म्हणून पार्वती क्षणार्धांत अंतर्धान पावली.

● ● ●

## पुष्पदंताचा कौशांबींत जन्म व बालपण

इकडे, भरतखंडांत कौशांबी नगरीमध्यें सोमदत्त नांवाचा एक विद्वान् ब्राह्मण राहत होता. त्याच्या बायकोचें नांव होतें वसुदत्ता. तीं दोघेंहि अत्यंत सुखानें संसार करीत होतीं. पण बराच काळपर्यंत त्यांना मूलबाळ नव्हतें. त्यामुळें अधून-मधून वसुदत्तेच्या डोळ्यांत असमा-धानाची छटा डोकावत असे. लवकरच तिच्या पूर्वपुण्याईमुळें तिचें भाग्य

उदयाला आलें. पार्वतीच्या शापानें मृत्युलोकांत अवतार घेणाऱ्या पुष्पदंतानें तिच्या पोटीं जन्म घेतला. त्याच्या जन्माच्या वेळीं अकस्मात् आकाशवाणी झाली, " वररुचि या नांवानें पुढें प्रसिद्धीला येणारा हा बालक एकपाठी होईल व वर्षाचार्यांकडून विद्या मिळवून व्याकरणशास्त्र अत्यंत लोकप्रिय करील. "

ही आकाशवाणी ऐकून पुष्पदंताच्या आईवडिलांचा आनंद गगनांत मावेनासा झाला. त्यांनीं मोठ्या समारंभानें त्याचें बारसें केलें. "कात्यायन" हें त्याचें पाळण्यांतलें नांव असलें तरी देववाणीनें सुचविल्याप्रमाणें त्या मुलाचें नांव वररुचि असेंच रूढ झालें. सर्वांत चांगली वस्तु ज्याला आवडते त्याला वररुचि म्हणतात. या छोट्या वररुचिलादेखील लहानपणापासून चांगल्या गोष्टींची आवड होती. त्याच्या आई-वडिलांनीं त्याचे सर्व लाड पुरविले. त्याला कोणतीहि गोष्ट कमी पडूं दिली नाहीं. तीं दोघेंहि त्याला अगदीं तळहाताच्या फोडाप्रमाणें वागवीत. पण वररुचीच्या नशिबीं तें सुख फारसें नव्हतें. तो लहान असतांनाच सोमदत्त मरण पावला. वसुदत्तेच्या जीवनाचा आधारच नाहींसा झाला. तिच्यावर आकाशाची कुऱ्हाड कोसळली. आपल्या एकुलत्या एक बाळाला कसें वाढवावयाचें ही काळजी त्या माउलीला पडली. दुसऱ्याकडे काबाडकष्ट करून दोघांची उपजीविका करणें तिच्या नशिबीं आलें. लाडक्या मुलासाठीं तिनें खूप कष्ट सोसले. अशा रीतीनें ती वररुचीला वाढवीत होती.

• • •

**पाहुण्यांचें आगमन**

एके दिवशीं दोन प्रवासी भटकत भटकत कौशांबी नगरींत आले. ते आले त्या वेळीं बरीच रात्र झाली होती. खूप लांबून आल्यामुळें ते दमून गेले होते. कोठें तरी रात्रींचा मुक्काम करावा म्हणून ते एका घरांत

डोकावून पाहूं लागले. तें घर होतें वसुदत्तेचें. त्यांच्या दमल्यानें शीण आलेल्या चेहऱ्याकडे तिचें लक्ष गेलें. तिनें त्यांची चौकशी केली. तिला त्यांची दया आली व तिनें अतिथीप्रमाणें त्यांचें आदरातिथ्य केलें.

वसुदत्तेनें केलेल्या आदरातिथ्यानें त्यांचे वाटचालीचे श्रम नाहींसे झाले. जेवण करून ते विश्रांति घेत बसले असतां, एकाएकीं मृदंगाचा आवाज ऐकूं येऊं लागला. तो आवाज ऐकून वसुदत्तेच्या मुखावर दुःखाची छटा पसरली. तिला आपल्या पतीची आठवण झाली. तिचा चेहरा उतरलेला पाहून वररुचीनें तिला विचारलें, तेव्हां ती म्हणाली, "बाळा ! तुझ्या वडिलांचा नंद नांवाचा एक मित्र आतां नृत्य करीत आहे. त्याच्या मृदंगाचा हा शब्द ऐकून मला त्यांची आठवण झाली. ते आतां असते, तर त्यांनीं तुलाहि नृत्यकलेंत असाच प्रवीण केला असता." आईचे हे शब्द ऐकून वररुचि म्हणाला, "आई ! मी तें नृत्य पाहून येतों व तुला तें जसेंच्या तसें करून दाखवितों. तेव्हां मला देतेस ना जायला परवानगी ?" वररुचीचे हे शब्द ऐकून आलेल्या प्रवाश्यांना फारच आश्चर्य वाटलें. त्यांनीं वररुचीची परीक्षा घेण्यासाठीं 'प्रातिशाख्य' नांवाच्या ग्रंथांतील कांहीं भाग मोठ्यानें म्हटला. प्रातिशाख्य म्हणजे काय हें वररुचीला यापूर्वी माहीतहि नव्हतें. प्रवाश्यांनीं म्हटलेलें प्रातिशाख्य ऐकून वररुचीनें तें तोंडपाठ म्हणून दाखविलें. तेव्हां तर त्यांच्या आश्चर्याला सीमाच राहिली नाहीं. नंतर वसुदत्तेच्या परवानगीनें वररुचि पाहुण्यांबरोबर नृत्य पाहायला गेला. मन लावून तो तें नृत्य पाहत होता. घरीं आल्यावर त्यानें पाहिलेलें नृत्य हुबेहूब करून दाखविलें. तें पाहून वसुदत्तेला आपल्या मुलाचें कौतुक वाटलें व आलेल्या पाहुण्यांचीं मनें आश्चर्यानें व आनंदानें भारावून गेलीं; कारण त्यांना हवी असलेली गोष्ट आतां मिळणार होती.

• • •

## पाहुण्यांच्या प्रवासाचा हेतु

हे पाहुणे म्हणजे विद्यार्जनासाठीं वणवण हिंडणारे दोन तरुण होत. त्यांचीं नांवें व्याडी व इंद्रदत्त अशीं होतीं. लहानपणींच दोघेहि आई-वडिलांना पारखे झाले होते. पण घरची खूप श्रीमंती असल्यामुळें त्यांना कोणत्याहि गोष्टीची उणीव नव्हती. लहानपणापासूनच त्यांना विद्येची आवड फार. विद्या मिळविण्यासाठीं दोघांनींहि कार्तिकेयाला प्रसन्न करण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें लहान वयांतच ते तपश्चर्या करूं लागले. कार्तिकेयस्वामी त्यांच्या एकदा स्वप्नांत आले व त्यांना म्हणाले, " बाळांनो ! पाटलीपुत्र नगरांत वर्ष नांवाचे एक विद्वान् पंडित आहेत. त्यांच्याकडून तुम्ही विद्या संपादन करा. " व्याडी व इंद्रदत्त हे घरदार सोडून प्रवास करीत करीत पाटलीपुत्र नगरांत आले. त्यांनीं नगरांतील कांहीं ब्राह्मणांकडे वर्षाचार्यांबद्दल चौकशी केली. तेव्हां त्या ब्राह्मणांनीं यांना वेड्यांतच काढलें. ब्राह्मण म्हणाले, " अहो ! वर्ष या नांवाचा एक वेडा आमच्या गांवांत राहतो. त्याला विद्येचा गंधहि नाहीं. त्याच्यापासून का तुम्ही विद्या शिकणार ? " हें ऐकून दोघेहि गोंधळांत पडले. काय करावें हें त्यांना सुचेना. शेवटीं चौकशी करीत करीत ते वर्षाचार्य राहत होते त्या ठिकाणीं येऊन पोहोंचले.

तें एक जुनाट घर होतें. घराच्या भिंतींचा भाग कांहीं ठिकाणीं ढासळला होता. घरावरचें छप्पर कांहीं भागांत मोडून खालीं कोसळलें होतें. तेथें कोणी राहत असतील असें त्यांना वाटलेंहि नाहीं. पण घरांत जाऊन त्यांनीं चौकशी करायचें ठरविलें. तोंच एका वयस्कर स्त्रीनें त्यांचें स्वागत केलें. त्यांची विचारपूस केल्यावर ती म्हणाली, " माझ्या जावेनें माझ्या पतींना एकदा एक वाण दिलें. मूर्खालाच तें वाण द्यायचें असतें असा संकेत आहे. माझ्या पतींनीं तें वाण घेतल्यामुळें 'मूर्ख' म्हणून मी त्यांची निर्भर्त्सना केली. इतर लोकहि

'मूर्ख' म्हणून त्यांना चिडवूं लागले. त्यामुळे ते अत्यंत दुःखी झाले व सर्वविद्यांत पारंगत होण्याच्या निश्चयानें त्यांनीं कार्तिकेयाची उपासना सुरू केली. संतुष्ट झालेल्या कार्तिकेयांनीं त्यांना सर्व विद्या सांगितल्या व एकपाठी विद्यार्थ्याला त्या शिकविण्याची आज्ञा केली. त्या वेळेपासून एकपाठी शिष्याची वाट पाहत ते वेड्यासारखे ध्यान लावून बसलेले असतात." तें ऐकून व्याडी व इंद्रदत्त यांना 'गुरु लाभले' म्हणून आनंद झाला; पण एकपाठी विद्यार्थी कसा मिळणार अशी काळजीहि लागून राहिली. त्यांनीं ध्यानस्थ गुरूंचें दर्शन घेतलें व गुरुजींच्या घरची गरिबी लक्षांत घेऊन खर्चासाठीं आपल्या जवळची बरीच संपत्ति त्यांनीं गुरुपत्नीच्या हवालीं केली. नंतर ते एकपाठी विद्यार्थ्याच्या शोधांत देशोदेशीं हिंडूं लागले. कौशांबींत आल्यानंतर वररुचि हा एकपाठी आहे अशी त्यांची खात्री पटली.

• • •

### वररुचीबद्दलची वसुदत्तेकडे मागणी

वररुचीच्या आईला त्यांनीं आपली सर्व हकिकत सांगितली व वररुचीला आपल्या हवालीं करण्याची त्यांनीं तिला विनंति केली. वसुदत्तेला तो योगायोग अपूर्व वाटला. कारण वर्षाचार्यांचा पत्ता आपणास कोठून मिळेल हा विचार अलीकडे नेहमीं तिच्या मनांत येत असे. त्या रात्रींहि तोच विचार तिच्या मनांत घोळत होता. आपले पति जिवंत असते, तर त्यांनीं केव्हांच वररुचीला वर्षाचार्यांकडे विद्या शिकण्यासाठीं नेऊन ठेवलें असतें, असें तिला वाटलें. व्याडी व इंद्रदत्त यांनीं तो विषय काढल्यानंतर, तिनें लागलीच त्यांची विनंति मान्य केली. मुलाचा वियोग होणार या कल्पनेनें तिला अत्यंत वाईट वाटत होतें; पण 'लवकरच आपल्या मुलाचें भाग्य उदयाला येणार' या विचारानें तिला खूप आनंदहि होत होता. वर्षाचार्यांसाठीं एकपाठी

(stamp)

शिष्य मिळविण्यांत आपणांस यश आलें. या जाणिवेनें व्याडी व इंद्रदत्त सुखानें झोपीं गेले व आपल्या मुलाच्या भावी जीवनाचीं चित्रें रंगवीत असतां, वसुदत्तेलाहि केव्हां झोप लागली तें समजलें नाहीं.

वररुचीला वर्षाचार्यांकडे पाठवायचें ठरलें. पण त्याची मुंज अजून झाली नव्हती. मुंज झाल्याशिवाय वेदविद्या शिकण्याचा अधिकार नसतो. म्हणून व्याडीनें आपल्या खर्चानें त्याची मुंज केली. लहानपणापासून जिवापलीकडे जपलेला आपला एकुलता एक मुलगा आपल्याला सोडून जाणार या कल्पनेनें वसुदत्तेचे डोळे भरून आले. पण वररुचीच्या जन्माच्या वेळीं झालेल्या आकाशवाणीची आठवण झाल्यावर तिनें आपलें दुःख आवरलें व भरल्या डोळ्यांनीं तिघांनाहि निरोप दिला.

● ● ●

## वर्षाचार्यांच्या घरीं विद्यासंपादन

कौशांबीहून प्रवास करीत करीत ते तिघेहि पाटलीपुत्र नगरांत आले. वर्षाचार्यांच्या घरीं आल्यावर त्यांनीं गुरुजींचें दर्शन घेतलें. तिघांनींहि भक्तिभावानें त्यांना वंदन केलें. तेव्हां त्यांनीं सर्वांची विचार-पूस केली व त्यांना त्या दिवशीं विश्रांति घेण्यास सांगितलें. वररुचि म्हणजे कार्तिकेयाची मूर्तिमंत कृपाच असें वर्षाचार्यांना वाटलें.

दुसरे दिवशीं वर्षाचार्य स्नानसंध्या करून बसले असतां, तिघेहि शिष्य शिकण्याच्या तयारीनें त्यांच्याकडे आले. आचार्यांना वंदन करून ते त्यांच्यासमोरच बसले. वर्षाचार्यांनीं दिव्यवाणीनें ॐकाराचा उच्चार केला. त्याच क्षणीं त्यांना सांगोपांग वेद आठवूं लागले. वर्षाचार्यांनीं वेदमंत्र एकदा म्हटला कीं वररुचि तो पाठ म्हणून दाखवी. वररुचीनें तो मंत्र म्हटलेला ऐकून, द्विपाठी व्याडीला तो आपोआप पाठ होई व अशा रीतीनें एकच मंत्र तीनदा ऐकायला मिळाल्यावर त्रिपाठी

इंद्रदत्त तो न चुकतां म्हणत असे. अशा तऱ्हेनें वर्षाचार्य आपल्या शिष्यांना वेद शिकवीत आहेत, ही बातमी ऐकून त्या गांवच्या ब्राह्मणांना आश्चर्य वाटलें. प्रथम या गोष्टीवर त्यांचा विश्वासच बसेना. मनांतल्या मनांत उपहास करीत ते वर्षाचार्यांच्या घरीं येत. आणि वेदपाठ म्हणण्याची ती पद्धत पाहून त्यांना आश्चर्याचा धक्काच बसे. वर्षाचार्यांबद्दल वाटणारा तिरस्कार आपोआपच गळून पडे व ते त्यांची क्षमा मागून श्रद्धाळू अंतःकरणानें त्यांचे पाय धरीत. ही गोष्ट क्रमाक्रमानें योगनंद राजालाहि समजली. राजा स्वतः पायींच वर्षाचार्यांच्या दर्शनाला आला व त्यांच्या अगाध पांडित्यानें तो आश्चर्यचकित होऊन गेला. वर्षाचार्यांना त्यानें पुष्कळ संपत्ति दान दिली व त्यांच्या घरचें दारिद्र्य कायमचें नष्ट केलें.

● ● ●

## उपकोशेबरोबर विवाह

अशा रीतीनें तिघांचें शिक्षण चालू होतें. थोड्याच कालावधींत त्यांनीं सर्व विद्या आत्मसात् केल्या. वररुचि आतां वयांत आला होता. विद्येचें तेजहि त्याच्या चेहऱ्यावर तळपत होतें. पाटलीपुत्र नगरांत एकदा इंद्रमहोत्सव चालू होता. त्या उत्सवांत नगरांतील बहुतेक स्त्रीपुरुष आत्मीयतेनें भाग घेत असत. वररुचीहि आपल्या मित्रांसह तो उत्सव पाहण्यासाठीं घरून बाहेर पडला. तोंच त्याच्या समोरून एक सुकुमार तरुण बालिका येत असलेली त्याला दिसली. वररुचि तिच्या मुग्ध सौंदर्यानें व शालीनतेनें मोहून गेला. त्या सुंदर मुलीचे डोळेहि विद्येच्या तेजानें तळपणाऱ्या उमद्या वररुचीवर खिळले. त्याच्याशीं चार शब्द बोलायला मिळावेत अशी तिची उत्कट इच्छा होती. पण पूर्वीची ओळख नसल्यामुळें व बरोबर कांहीं मैत्रिणी असल्यामुळें तिला खेदानें तसेंच घरीं जावें लागलें. ती कोण आहे हें जाणून घेण्याची उत्कट इच्छा वररुचीलाहि होती. इंद्रदत्तानें त्याच्यासाठीं तिची चौकशी केली. तेव्हां ती

आपल्या गुरुजींच्या उपवर्ष नांवाच्या बंधूची मुलगी आहे असें त्याला समजलें. तिचें नांव होतें उपकोशा.

तिला पाहिल्यापासून वररुचीचें मन अस्वस्थ झालें. शिकण्याकडे त्याचें लक्ष लागेना. शिवाय बहुतेक सर्व विद्या त्यानें आत्मसात् केल्या होत्या. तेव्हां आतां गृहस्थाश्रम स्वीकारावा असे विचार त्याच्या मनांत डोकावत होते. उपकोशा आपल्या आयुष्याची जोडीदारीण होईल का या विचारानें तो खूपच अस्वस्थ झाला. बराच वेळ त्याला झोपहि आली नाहीं. शेवटीं पहाटेच्या वेळीं त्याला थोडी झोप लागली. थोड्याच वेळांत शुभ्र वस्त्र नेसलेली देवी सरस्वती त्याच्या स्वप्नांत आली. ती त्याला म्हणाली, "ही उपकोशा म्हणजे पूर्वजन्मींची तुझी पत्नीच आहे. तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणालाहि ती वरणार नाहीं." देवीचे हे शब्द ऐकून त्याला अत्यंत आनंद झाला.

दुसरे दिवशीं वररुचि उपकोशेच्या महालाकडे गेला. तिची भेट व्हावी या अपेक्षेनें तो बागेंतील एका झाडाखालीं उभा होता. वररुचीची पुनः भेट होईल का या विचारानें उपकोशा शून्य दृष्टीनें खिडकींतून बाहेर डोकावत होती. आपला प्रियकर आपल्या बागेंतच उभा असलेला तिला दिसला. तिचा स्वतःच्या डोळ्यावरहि विश्वास बसेना. तिनें आपल्या जिवलग मैत्रिणीला त्याच्याकडे पाठविलें व आपण त्याला मनानें वरलें असल्याचें कळविलें. तें ऐकून वररुचीला मोठा हर्ष झाला, पण वाडवडिलांच्या संमतीनेंच हा विवाह व्हावा असा त्यानें आग्रह धरला. शेवटीं उपकोशेच्या मैत्रिणीनें ही गोष्ट तिच्या आईच्या कानावर घातली. तिनें ती आपल्या पतीला सांगितली. वररुचीसारखा बुद्धिमान जांवई आपल्याला मिळणार या विचारानें उपकोशेच्या आईवडिलांना धन्यता वाटू लागली. त्यांनीं कौशांबीहून वसुदत्तेला आणविलें व मोठ्या

थाटामाटानें उपकोशेचा वररुचीशीं विवाह केला. नंतर तो वर करून पाटलीपुत्रांतच राहूं लागला.

• • •

## पाणिनीचें बाळपण

कांहीं काळ गेल्यानंतर वर्षाचार्यांकडे अनेक शिष्य विद्या शिकण्यासाठीं येऊं लागले. त्यांच्यामध्यें पाणिनी नांवाचा एक अत्यंत मठ्ठ विद्यार्थी होता. शिक्षणाच्या बाबतींत तो नेहमींच मागें पडत असे. गुरूची सेवा करण्याचाहि त्याला फार कंटाळा होता. वर्षाचार्यांच्या पत्नीनें शेवटीं त्याला हांकलून लावलें. तेव्हां मात्र अपमानानें त्याचें मन जळूं लागलें. त्या वेदना त्याला सहन झाल्या नाहींत. तो तेथून निघाला, तो तडक हिमालयांत आला. खडतर तपश्चर्या करून त्यानें शंकरांना प्रसन्न करून घेतलें. शंकरांनीं नृत्यानंतर वाजविलेल्या डमरूमधून पाणिनीला चौदा सूत्रांचा साक्षात्कार झाला. त्यावर त्यानें नवें व्याकरणशास्त्र तयार केलें.

• • •

## पाणिनीकडून वररुचीचा पराभव

तेथून परत आल्यावर पाणिनीनें वादविवादासाठीं वररुचीला आह्वान दिलें. सतत सात दिवस दोघांमध्यें वादविवाद चालला होता. आठव्या दिवशीं वररुचीनें पाणिनीला वादांत जिंकलें. शंकर आकाशांत राहून तो वादविवाद ऐकत होते. तो आपलाच पराभव आहे असें समजून त्यांनीं रागानें मोठा हुंकार केला त्यामुळें वररुचीनें लोकप्रिय केलेलें ‘ ऐंद्र व्याकरण ’ पृथ्वीवरून नष्ट झालें व वररुचि वगैरे विद्वान् पंडित, मूर्ख समजले जाऊं लागले. वररुचीच्या मनाला ही गोष्ट फार लागून राहिली. हिरण्यगुप्त नांवाचा एक वाणी त्याचा जिवलग मित्र होता. घरच्या

खर्चासाठीं बरीचशी रक्कम त्यानें त्याच्या हवालीं केली व तपश्चर्येनें शंकरांना प्रसन्न करून घेण्यासाठीं तो हिमालयांत गेला. तेथें व्रतस्थ राहून तो खडतर तपश्चर्या करूं लागला.

• • •

## उपकोशेवरील संकट

वररुचीच्या तपश्चर्येला लवकर फळ यावें म्हणून इकडे उपकोशाहि व्रतस्थ राहूं लागली. रोज गंगेंत स्नान करण्याचें व्रत तिनें घेतलें. गंगा-स्नानासाठीं ती नित्य नियमानें नदीवर जात असे. एकदां ती अशीच स्नानासाठीं नदीवर गेली असतांना राजाच्या पुरोहितानें ती एकटी आहे असें पाहून तिला लुबाडण्याचें ठरविलें व तिला वाटेंतच अडविली. त्याचा हेतु तिच्या लक्षांत आला. पण ती फार धीराची होती. तिनें न डगमगतां त्याला रात्रींच्या पहिल्या प्रहरीं आपल्या घरीं यायला सांगि-तलें. तो खुष होऊन निघून गेला. तोंच एका अंमलदारानें त्याच हेतूनें तिला वाटेंत गांठलें. त्याला रात्रींच्या दुसऱ्या प्रहरीं आपल्या घरीं यायला सांगून तिनें वाटेला लावलें. ती थोडी पुढें गेली न गेली तोंच मंत्र्याचा मुलगा तिची वाट अडवून उभा ! रात्रीच्या तिसऱ्या प्रहरीं तिनें त्याला यायला सांगितलें व ती घरीं आली. त्यानंतर तिनें आपल्या एका दासीला खर्चाकरितां पैसे मागण्यासाठीं म्हणून हिरण्यगुप्ताकडे पाठविलें; पण त्या दुष्टाच्या मनांतहि भलतेच विचार चालू होते. तो स्वतः उपकोशेकडे आला व उपकोशेला म्हणाला, " तुझ्या पतीनें खर्चासाठीं माझ्याजवळ पैसे ठेवले आहेत. पण तूं माझी सेवा करायला तयार असशील तरच मी ते पैसे तुला देईन. " उपकोशेनें विचार केला, ' आपल्या पतीनें याला पैसे दिले तेव्हां कोणीहि साक्षीदार तेथें नव्हता, तेव्हां यानें तें नाकबूल केलें तर आपल्याला कांहींच करतां येणार नाहीं. याच्याहि बाबतींत आपण कांहीं-

तरी उपाय योजला पाहिजे.' असा विचार करून तिनें त्या व्यापाऱ्याला रात्रींच्या चवथ्या प्रहरीं घरीं बोलाविलें व ती आपल्या तयारीला लागली.

● ● ●

## उपकोशेची युक्ति

तिनें खूप खोबरेल तेल घेतलें. त्यांत बरेचसें काजळ कालविलें. त्याचा संशय येऊं नये म्हणून त्यांत कस्तुरीहि मिसळली. काळा रंग कालवून पाण्याचे हंडे तापविले व तीन मोठे पेटारे आणून ती येणाऱ्यांची वाट पाहूं लागली.

रात्रीच्या पहिल्या प्रहरीं पुरोहित आला. सेवकांनीं त्याचें स्वागत केलें. "उपकोशा देवघरांत आहे, आपणहि स्नान करून तिची तेथें भेट घ्यावी," असें एका सेवकानें सांगितलें. पुरोहित स्नान करण्यासाठीं तयार झाला, तेव्हां सेवकांनीं मुद्दाम तयार केलेल्या त्या तेलानें अंधुक प्रकाशांत त्याचें शरीर खूप चोळलें. नंतर काळ्या रंगाच्या पाण्यानें त्याला स्नान घातलें व तो स्नान-घरांतून बाहेर आला, तोंच दोघां तिघांनीं मिळून जवळच असलेल्या पेटाऱ्यांत त्याला कोंबलें व पेटाऱ्याला बाहेरून भलें मोठें कुलूप लावून टाकलें. अशाच तऱ्हेनें रात्रीच्या दुसऱ्या प्रहरीं आलेल्या अंमलदाराचा व तिसऱ्या प्रहरीं आलेल्या सचिवकुमाराचा तिनें बंदोबस्त केला. चवथ्या प्रहरीं हिरण्यगुप्त आला त्यालाहि नोकरांनीं तसेंच स्नान घातलें. त्याचें स्नान झाल्यावर उपकोशा स्वतः तेथें आली व तिनें पैशाचा विषय काढला. तेव्हां हिरण्यगुप्त म्हणाला, "तुझ्या पतीनें दिलेले पैसे मी तुला देईन, पण ... ..." त्याला पुढें बोलूं न देतां, पेटींत कोंडून ठेवलेल्यांना ऐकूं जाईल अशा मोठ्या आवाजांत ती म्हणाली, "देवतांनो ! हे हिरण्यगुप्ताचे शब्द ऐका हं !" नंतर आपल्या नोकरांकरवीं गचांडी देऊन तिनें हिरण्यगुप्ताला हांकलून दिलें. त्या वेळीं अरुणोदयाची वेळ होती. हिरण्यगुप्त रस्त्यावर

आला. त्याचें आपल्या शरिराकडे लक्ष गेलें. सगळें शरीर कोळशापेक्षांहि काळें झालेलें. अंगावर पुरेशीं वस्त्रेंहि नव्हतीं. अशा स्थितींत तो शरमिंदा होऊन लपतछपत कसाबसा आपल्या घरीं आला.

• • •

## हिरण्यगुप्ताची फजीति

सकाळीं तडक राजसभेंत जाऊन उपकोशेनें आपली तक्रार राजाला सांगितली. राजानें हिरण्यगुप्ताला लागलीच बोलावणें पाठविलें. हिरण्यगुप्तानें घरीं येऊन आपल्या अंगाचा काळा रंग धुऊन काढण्याचा प्रयत्न केला. पण चोळल्यानें तो अंगांत जास्त जास्तच मुरूं लागला. शेवटीं तशाच स्थितींत कपडे करून तो राजसभेंत आला. राजानें त्याला विचारलें, तेव्हां तो म्हणाला, " महाराज हिच्या मालकीची एक कवडीहि माझ्याकडे नाहीं. ही सर्वस्वीं खोटें सांगत आहे." तेव्हां उपकोशा राजाला म्हणाली, " हाच लबाड मनुष्य खोटें बोलत आहे. माझ्या पतीनें तपश्चर्येला जातांना गृह-देवतांना पेटाऱ्यांत घालून ठेवलें आहे. त्यांच्या देखत पैसे घेतल्याचें यानें कबूल केलें आहे. आपल्याला पुरावाच हवा असेल तर त्या पेट्या माझ्या घरून आणवून आपणच त्या देवतांना विचारावें." ही अद्भुत गोष्ट ऐकून राजा आश्चर्यचकित झाला. त्यानें ते पेटारे आपल्या सेवकां-कडून राजसभेंत आणविले. पेटाऱ्यांत असलेल्यांना आपलें बिंग बाहेर फुटेल म्हणून भीति वाटत होती. म्हणून शेवटपर्यंत त्यांनीं हूं कीं चूं केलें नाहीं.

राजसभेंत ते पेटारे आणून ठेवल्यावर उपकोशा मोठ्यानें म्हणाली, " हे गृहदेवतांनो ! हिरण्यगुप्त काल रात्रीं काय म्हणाला, तें खरेंखुरें सांगा. नाहीं तर या पेट्या उघडून मी तुम्हांला राजाच्या हवालीं करीन." उपकोशेचे हे शब्द ऐकून पेटाऱ्यांत असलेल्या तिघांची भीतीनें गाळण उडाली. ते अगदीं भेदरून गेले होते. " हिरण्यगुप्तानें वसुदत्तेच्या पतीकडून

पैसे घेतले आहेत व ते परत देण्याचें आपल्यादेखतच कबूल केलें आहे" असें तिघांनींहि सांगितलें. यावर हिरण्यगुप्ताला कांहीं बोलायला तोंडच उरलें नाहीं. आधींच काळा झालेला त्याचा चेहरा शरमेनें अधिकच काळवंडला. मान खालीं घालून त्यानें सर्व गोष्टी कबूल केल्या व "वररुचीनें आपल्याकडे दिलेले सर्व पैसे घरीं गेल्यावर उपकोशेला देईन" असें वचन दिलें.

● ● ●

## गृहदेवतांचें गुपित

त्या एकंदर घटनेनें राजसभेंतील सर्व लोक आश्चर्यचकित झाले. राजालाहि त्या गृहदेवतांबद्दल फारच उत्सुकता लागून राहिली. त्यानें फारच आग्रह धरल्यानंतर उपकोशेनेंहि विशेष आढेवेढे घेतले नाहींत. तेव्हां राजानें नोकरांकडून पेटाऱ्यांचीं कुलुपें फोडलीं. आणि दारें उघडलीं. तों काय ! काळेकभिन्न असे तीन पुरुष बाहेर पडले. त्यांना कोणींहि ओळखूं शकलें नसतें. पण राजसभेंत त्यांचें नेहमी जाणें येणें असल्यामुळें त्या आकृति लोकांना परिचयाच्या वाटूं लागल्या. निरखून पाहिल्यानंतर सर्वांना त्यांची ओळख पटली. मान वर करून पाहण्याचाहि धीर त्यांना होत नव्हता. राजानें सर्व गोष्टींची चौकशी केली व त्यांच्या दुष्ट हेतूबद्दल त्यांना आपल्या राज्यांतून हांकलून लाविलें. सर्वांनीं उपकोशेच्या चातुर्याची प्रशंसा केली. राजा तर तिला आपल्या बहिणीप्रमाणें मानूं लागला. त्यानें तिला खूप मोठी देणगी देऊन आपल्या घरीं पाठविलें.

कांहीं काळानंतर वररुचीच्या खडतर तपश्चर्येनें शंकर प्रसन्न झाले व पाणिनीनें सुरूं केलेलेंच व्याकरणशास्त्र त्यांनीं वररुचीलाहि स्पष्ट करून सांगितलें. शंकरांनीं सांगितल्यावरून पाणिनीच्या व्याकरणांतील कांहीं उणिवा त्यानें भरून काढल्या व व्याकरणशास्त्र पूर्णावस्थेला नेऊन

पोंचविलें. तो घरीं आला तेव्हां उपकोशेच्या चातुर्याची गोष्ट ऐकून तो चकितच झाला.

● ● ●

## गुरुदक्षिणेची तयारी

वर्षाचार्यांना हें नवीन व्याकरण वररुचीच्या तोंडून ऐकण्याची इच्छा झाली. पण प्रत्यक्ष कार्तिकेयानेंच तें त्यांना स्पष्ट करून सांगितलें. नंतर व्याडी व इंद्रदत्त यांनीं वर्षाचार्यांना गुरुदक्षिणा घेण्याची विनंति केली. गुरुदक्षिणा म्हणून वर्षाचार्यांनीं त्यांच्याकडे एक कोटि सुवर्ण-मोहरा मागितल्या. ते जरी घरचे श्रीमंत असले, तरी इतकी रक्कम दक्षिणा म्हणून देणें त्यांना अशक्य होतें. काय करावें तें त्यांना सुचेना. दक्षिणा न द्यावी तर आतांपर्यंत शिकलेली विद्या वायां जाईल अशी त्यांना भीति वाटूं लागली. शिवाय वचनभंगाचें पातकहि त्यांच्या माथीं बसलें असतें. शेवटीं ते वररुचीकडे आले व त्यांनीं आपली अडचण त्याला स्पष्ट करून सांगितली. व्याडी म्हणाला, " मित्रा! आपल्यावर मोठा बिकट प्रसंग ओढवला आहे. इतकी मोठी रक्कम नंदराजाशिवाय दुसरा कोणीहि आपणांस देणार नाहीं. तेव्हां आपण तिघेहि जाऊन त्याच्याकडेच याचना करूं. त्यानें उपकोशेला आपली बहीण मानली आहेच. त्यामुळें परंपरेनें तो तुझा मेहुणा आहे. तेव्हां तूं यांत पुढाकार घे, म्हणजे आपलें काम फत्ते होईल."

● ● ●

## योगनंदाचा पुनर्जन्म

वररुचीलाहि तो विचार पटला. ते तिघेहि योगनंद राजाकडे जावयाला निघाले. योगनंद त्या वेळीं अयोध्येमधील शिबिरांत होता. ते तिघे सहाध्यायी मोठ्या आशेनें अयोध्येंत आले. पण सुखासुखीं ती रक्कम मिळणें त्यांच्या नशिबीं नव्हतें. कारण ते नगरांत प्रवेश करतात तोंच योगनंद

स्वर्गवासी झाल्याचें त्यांना समजलें. अयोध्येवर दुःखाची छाया पसरली. राजाचें अंत्यदर्शन घेण्यासाठीं शिबिराकडे लोकांची रीघ लागली. अशा स्थितींत काय करावें हें कोणालाच सुचेना. शेवटीं योगविद्येंत पारंगत असलेल्या इंद्रदत्ताला एक अजब युक्ति सुचली. तो आपल्या मित्रांना म्हणाला, " आतांच दिवंगत झालेल्या राजाच्या शरिरांत मी माझे प्राण घालतों. त्यामुळें राजा जिवंत झाला असें वाटून लोकांना आनंद होईल. राजवाड्यांतहि मोठा दानधर्म सुरू होईल. थोड्याच वेळांत वररुचीनें माझ्याकडे एक कोटि मोहरा मागण्यासाठीं यावें. मी लागलीच त्या देण्याची आज्ञा सोडीन. वररुचीला त्या मोहरा मिळाल्या म्हणज पुनः मी माझ्या शरिरांत प्रवेश करीन. तोंपर्यंत व्याडीनें माझ्या शरिराचें गुप्तपणें रक्षण करावें." या कल्पनेला त्याच्या मित्रांनीं एकमतानें पाठिंबा दिला. तेव्हां वेळ न लावतां इंद्रदत्तानें राजाच्या शरिरांत प्रवेश केला. राजाच्या मृत शरिरांत पुनः हालचाल सुरू झाली. लोकांचा या गोष्टीवर विश्वासहि बसेना. राजानें हळूहळू आपले डोळे उघडले तेव्हां सगळीकडे आनंदीआनंद झाला. दवंडी पिट-वून राजधानींत महोत्सव साजरे झाले.

त्याच वेळीं व्याडि इंद्रदत्ताच्या मृत शरिराचें रक्षण करीत राहिला होता. ठरल्याप्रमणें वररुचि दक्षिणेची रक्कम दान म्हणून मागण्यासाठीं राजाकडे आला. राजाचा पुनर्जन्म झाला म्हणून राजाच्या शिबिरांत मोठ्या प्रमाणांत दानधर्म सुरू झाला होता. त्यामुळें वररुचीला राजापर्यंत सहज प्रवेश मिळूं शकला. त्यानें राजाकडे एक कोटि मोहरांचें दान मागितलें. राजानें मुळींच आढेवेढे न घेतां त्याची विनंति मान्य केली व शकटाल नांवाच्या आपल्या मंत्र्याला एक कोटि मोहरा त्या ब्राह्मणाला देण्याची आज्ञा दिली.

• • •

**शकटालाचा डाव**

पण शकटाल हा एक अत्यंत चाणाक्ष मंत्री होता. राजा मरण पावून पुनः जिवंत होतो, त्याच वेळीं एक ब्राह्मण त्याच्याकडे एक कोटि मोहरा मागतो व कसलाहि विचार न करतां राजा ती मागणी मान्य करतो, यांत कांहीं तरी लबाडी असली पाहिजे अशी त्याची खात्री झाली; पण राजपुत्र वयानें फारच लहान होता व शत्रूंनीं राज्यांत सगळीकडे उठाव केला होता, म्हणून राजा पुनः सजीव झाला या गोष्टीनें त्याला समाधान झालें. इकडे एक कोटि मोहरा ब्राह्मणाला दान देण्याची निकड राजानें लावली. तेव्हां कांहीं ना कांहीं सबब सांगून शकटालानें ती गोष्ट लांबणीवर टाकली. त्या अवधींत आपल्या सेवकांना बोलावून त्यानें आज्ञा दिली, " या क्षणीं अयोध्या नगरींत व इतरत्र जवळपास कोठें प्रेतें असल्यास त्यांचा शोध करा व मिळतील तीं प्रेतें लागलीच जाळून टाका." लागलीच शहरांत सगळीकडे शोधाशोध सुरू झाली. शहराबाहेरच्या एका ओसाड देवळांत इंद्रदत्ताचा निर्जीव देह त्या सेवकांना दिसला. सेवक तो देह बळेंच नेऊं लागले. तेव्हां, " समाधि लावून बसलेला हा माझा मित्र आहे. नेऊं नका हो त्याला " असें म्हणत व्याडीनें त्यांना परोपरीनें विनविलें. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. त्यांनीं तो मृत देह तेथल्या तेथें जाळून टाकला.

व्याडि तसाच राजदरबारांत आला व " काय हा अन्याय ! काय ही अंदाधुंदी ! समाधि लावून बसलेल्या माझ्या मित्राला मंत्र्यानें जाळून कीं हो टाकला ! याची दाद आतां मागायची तरी कोणाकडे ? " असें मोठमोठ्यानें ओरडून तो गळा काढून रडूं लागला. व्याडीचा हा आक्रोश योगनंदाच्या शरिरांत राहत असलेल्या इंद्रदत्ताला ऐकूं आला. तेव्हां त्याची अत्यंत शोचनीय अवस्था झाली. ब्राह्मणाच्या देहाला तो आतां कायमचा पारखा झाला होता.

शकटालानें त्याचा डाव त्याच्यावर उलटविला होता. राजाच्या शरिरांतील आत्मा आतां तें शरीर सोडून जाणार नाहीं अशी खात्री पटल्यावर, शकटालानें वररुचीला एक कोटि मोहरा दिल्या. राजाच्या रूपानें वावरणाऱ्या इंद्रदत्तानें व्याडीची एकान्तांत गाठ घेतली व आपल्या नशिबीं कायमचा शूद्र राजाचा देह आला म्हणून, तो शोक करूं लागला. तेव्हां व्याडि समजावणीच्या स्वरांत त्याला म्हणाला, " मित्रा ! आतां शोक करण्यांत काय अर्थ आहे ? शकटाल फारच धूर्त आहे. त्याला आपल्या कटाची शंका आली आहे म्हणूनच त्यानें तुझा पूर्वीचा देह जाळून टाकला असावा. आतां तो चंद्रगुप्ताला हाताशीं धरून तुलाहि नाहींसा करावयास मागेंपुढें पाहणार नाहीं. तेव्हां वररुचीला तूं आपला मुख्य मंत्री कर म्हणजे त्याच्या अलौकिक बुद्धिमत्तेच्या जोरावर तुला कोणत्याहि संकटांतून पार पडतां येईल व तुझें राज्य स्थिर होईल. " असा उपदेश करून, वररुचीनें आणून दिलेली गुरुदक्षिणा वर्षाचार्यांना देण्यासाठीं व्याडि निघून गेला.

• • •

## वररुचीला प्रधानमंत्रिपद व शकटालाला शिक्षा

राजाला व्याडीचा सल्ला पटला. त्यानें वररुचीला लागलीच बोलावून घेतलें. शकटाल जिवंत असेपर्यंत प्रत्यक्ष बृहस्पति अवतरला असता, तरी राजाच्या जिवाला धोका होता, मग केवळ वररुचीची काय कथा ? म्हणून शकटालाचा कांटा काढायचा असें दोघांनीं ठरविलें. ' जिवंत ब्राह्मणाला शकटालानें जाळलें ' असा आरोप ठेवून राजानें शकटालाला शिक्षा करण्याचें योजिलें. त्याप्रमाणें त्यानें शकटालाला त्याच्या शंभर मुलांसह एका आटलेल्या अंधाऱ्या विहिरींत सोडून देण्याची आज्ञा दिली. मात्र रोज एक मडकेंभर सातू व एक मडकेंभर पाणी त्या विहिरींत सोडण्याची दया राजानें दाखविली.

स्वामिभक्त शकटाल या गोष्टीमुळें अत्यंत चिडला होता. तो आतां सूडाच्या भावनेनें पेटला होता. तो आपल्या मुलांना म्हणाला, " बाळांनो ! आपणांवर प्राणसंकट ओढवलें आहे. या सातूवर व या पाण्यावर एकच मनुष्य कसाबसा जगूं शकेल. तुमच्यांपैकीं जो कोणी या दुष्ट राजाचा सूड उगविण्यास समर्थ असेल त्यानें यावर आपली उपजीविका करावी व संधि मिळेपर्यंत मन घट्ट करून येथील नरकयातना, सहन कराव्या. " हे निकराचे शब्द ऐकून ' शकटालानेंच त्या कार्याची जबाबदारी घ्यावी ' असें सर्व मुलांनीं एकमतानें ठरविलें. शकटाल नाइलाजानें त्या गोष्टीला कबूल झाला. आपल्या डोळ्यांदेखत आपलीं मुलें अन्नपाण्यावांचून तड-फडून मरत आहेत हें दृश्य त्याला पाहवेना. सूडाच्या भावनेमुळेंच, केवळ जिवंत राहण्यासाठीं तो दोन घांस कसेबसे घशाखालीं कोंबीत असे व भविष्यकाळावर नजर ठेवून तो आपल्या हातानें आपल्या मुलांना यमा-च्या दाढेंत ढकलीत असे. शेवटीं मुलांच्या हाडांचे सांपळे त्याच्या भोंवतीं अस्ताव्यस्त पसरले व त्यांच्या सडत जाणाऱ्या मांसाची दुर्गंधि त्याला असह्य होऊं लागली. अशा स्थितींत त्या अंधाऱ्या खोल विहिरींत तो आपल्या आयुष्याचे क्षण मोजीत दिवस कंठूं लागला.

● ● ●

## व्याडीचं आगमन व शेवटचा निरोप

त्या अवधींत व्याडि वर्षाचार्यांना पूर्वी कबूल केलेली गुरुदक्षिणा देऊन परत आला. त्यानें योगनंद राजाची – म्हणजेच आपला मित्र इंद्रदत्त याची – भेट घेतली. एकमेकांची विचारपूस झाल्यानंतर राजानें त्याला आपल्या दरबारीं राहण्याचा खूप आग्रह केला. पण व्याडि त्या मोहाला बळी पडला नाहीं. त्यानेंहि व्याकरणशास्त्रावर एक प्रचंड ग्रंथ रचला. शेवटीं आपलें राहिलेलें आयुष्य तपश्चर्येंत घालविण्यासाठीं तो वनांत निघून गेला.

शकटालानें त्याचा डाव त्याच्यावर उलटविला होता. राजाच्या शरिरांतील आत्मा आतां तें शरीर सोडून जाणार नाहीं अशी खात्री पटल्यावर, शकटालानें वररुचीला एक कोटि मोहरा दिल्या. राजाच्या रूपानें वावरणाऱ्या इंद्रदत्तानें व्याडीची एकान्तांत गाठ घेतली व आपल्या नशिबीं कायमचा शूद्र राजाचा देह आला म्हणून, तो शोक करूं लागला. तेव्हां व्याडि समजावणीच्या स्वरांत त्याला म्हणाला, " मित्रा ! आतां शोक करण्यांत काय अर्थ आहे ? शकटाल फारच धूर्त आहे. त्याला आपल्या कटाची शंका आली आहे म्हणूनच त्यानें तुझा पूर्वींचा देह जाळून टाकला असावा. आतां तो चंद्रगुप्ताला हाताशीं धरून तुलाहि नाहींसा करावयास मागेंपुढें पाहणार नाहीं. तेव्हां वररुचीला तूं आपला मुख्य मंत्री कर म्हणजे त्याच्या अलौकिक बुद्धिमत्तेच्या जोरावर तुला कोणत्याहि संकटांतून पार पडतां येईल व तुझें राज्य स्थिर होईल. " असा उपदेश करून, वररुचीनें आणून दिलेली गुरुदक्षिणा वर्षाचार्यांना देण्यासाठीं व्याडि निघून गेला.

• • •

## वररुचीला प्रधानमंत्रिपद व शकटालाला शिक्षा

राजाला व्याडीचा सल्ला पटला. त्यानें वररुचीला लागलीच बोलावून घेतलें. शकटाल जिवंत असेपर्यंत प्रत्यक्ष बृहस्पति अवतरला असता, तरी राजाच्या जिवाला धोका होता, मग केवळ वररुचीची काय कथा ? म्हणून शकटालाचा कांटा काढायचा असें दोघांनीं ठरविलें. ' जिवंत ब्राह्मणाला शकटालानें जाळलें ' असा आरोप ठेवून राजानें शकटालाला शिक्षा करण्याचें योजिलें. त्याप्रमाणें त्यानें शकटालाला त्याच्या शंभर मुलांसह एका आटलेल्या अंधाऱ्या विहिरींत सोडून देण्याची आज्ञा दिली. मात्र रोज एक मडकेंभर सातू व एक मडकेंभर पाणी त्या विहिरींत सोडण्याची दया राजानें दाखविली.

स्वामिभक्त शकटाल या गोष्टीमुळें अत्यंत चिडला होता. तो आतां सूडाच्या भावनेनें पेटला होता. तो आपल्या मुलांना म्हणाला, " बाळांनो ! आपणांवर प्राणसंकट ओढवलें आहे. या सातूवर व या पाण्यावर एकच मनुष्य कसाबसा जगूं शकेल. तुमच्यांपैकीं जो कोणी या दुष्ट राजाचा सूड उगविण्यास समर्थ असेल त्यानें यावर आपली उपर्जीविका करावी व संधि मिळेपर्यंत मन घट्ट करून येथील नरकयातना, सहन कराव्या. " हे निकराचे शब्द ऐकून ' शकटालानेंच त्या कार्याची जबाबदारी घ्यावी ' असें सर्व मुलांनीं एकमतानें ठरविलें. शकटाल नाइलाजानें त्या गोष्टीला कबूल झाला. आपल्या डोळ्यांदेखत आपलीं मुलें अन्नपाण्यावांचून तड-फडून मरत आहेत हें दृश्य त्याला पाहवेना. सूडाच्या भावनेमुळेंच, केवळ जिवंत राहण्यासाठीं तो दोन घांस कसेबसे घशाखालीं कोंबीत असे व भविष्यकाळावर नजर ठेवून तो आपल्या हातानें आपल्या मुलांना यमा-च्या दाढेंत ढकलीत असे. शेवटीं मुलांच्या हाडांचे सांपळे त्याच्या भोंवतीं अस्ताव्यस्त पसरले व त्यांच्या सडत जाणाऱ्या मांसाची दुर्गंधि त्याला असह्य होऊं लागली. अशा स्थितींत त्या अंधाऱ्या खोल विहिरींत तो आपल्या आयुष्याचे क्षण मोजीत दिवस कंठूं लागला.

● ● ●

## व्याडीचें आगमन व शेवटचा निरोप

त्या अवधींत व्याडि वर्षाचार्यांना पूर्वी कबूल केलेली गुरुदक्षिणा देऊन परत आला. त्यानें योगनंद राजाची – म्हणजेच आपला मित्र इंद्रदत्त याची – भेट घेतली. एकमेकांची विचारपूस झाल्यानंतर राजानें त्याला आपल्या दरबारीं राहण्याचा खूप आग्रह केला. पण व्याडि त्या मोहाला बळी पडला नाहीं. त्यानेंहि व्याकरणशास्त्रावर एक प्रचंड ग्रंथ रचला. शेवटीं आपलें राहिलेलें आयुष्य तपश्चर्येंत घालविण्यासाठीं तो वनांत निघून गेला.

ताडाचें एक झाड आहे. आज रात्रीं तूं त्या झाडावर चढून लपून रहा. म्हणजे मेलेला मासा कां हंसला तें तुला कळेल."

सरस्वतीनें सांगितल्याप्रमाणें वररुचि रात्रीं त्या उंच ताडाच्या झाडावर चढून, पानांआड दडून बसला. तोंच एक अक्राळविक्राळ चेहऱ्याची एक भयंकर राक्षसी तिकडे येतांना त्याला दिसली. 'आपण हिच्या दृष्टीला पडलों तर आपली कांहीं धडगत नाहीं' या विचारानें त्यानें आपला श्वासहि रोधून धरला व मुळींच हालचाल न करतां तो फांदीला बिलगून निपचित पडून राहिला. राक्षसीचीं मुलें तिच्याकडे कांहीं तरी खायला मागत होतीं. कांहीं केल्या तीं ऐकेनात. तेव्हां ती त्यांना म्हणाली, "बाळांनों! आज आतांच मी तुम्हांला एका ब्राह्मणाचें मांस देणार होतें. पण एक मेलेला मासा हंसल्यामुळें राजानें त्याला मारण्याचा हुकूम मागें घेतला. तेव्हां उद्यां मी तुम्हांला मांस खायला देईन." मेलेला मासा हंसण्याचें कारण मुलांनीं विचारलें असतां राक्षसी म्हणाली, "राजाच्या अंतःपुरांत पुरुषांना प्रवेश नाहीं. पण स्त्रीवेषानें कांहीं पुरुषहि तेथें वावरतात, त्यांची दखल या राजाला नाहीं. पण बिचाऱ्या ब्राह्मणानें कांहीं तरी मागण्याच्या हेतूनें राणीकडे पाहिलें तोंच राजानें त्याला मृत्यूची शिक्षा दिली. या अनागोंदी कारभारामुळें मेलेल्या माशाला देखील हंसूं फुटलें." वररुचि कान देऊन राक्षसीचे शब्द ऐकत होता. राक्षसी मुलांसह निघून गेल्यावर तो हळूच झाडावरून खालीं उतरला व वाड्यांत जाऊन तो समाधानानें झोपीं गेला. सकाळीं उठून त्यानें राजाची भेट घेतली व त्याला माशाच्या हंसण्याचें कारण सांगितलें. तें ऐकून राजा संतापानें बेभान झाला व अन्तःपुराची झडती घेण्याची त्यानें लागलींच आज्ञा दिली. त्या वेळीं स्त्रीवेषांत वावरणारे कांहीं पुरुष आढळून आले. त्यांना फांशीची शिक्षा फर्मावून राजानें ब्राह्मणाची मुक्तता केली व वररुचीच्या बुद्धीचें कौतुक करून त्याचा मोठा सत्कार केला.

● ● ●

## वररुचीवरचें प्राणसंकट

राजाच्या हट्टी व लहरी स्वभावाचा त्रास अनेकांना होऊं लागला. वररुचीला त्याबद्दल फारच चिंता वाटूं लागली. शकटाल त्याला धीर देत असे. पण त्यालाहि मनांतून राजाच्या लहरी स्वभावाची भीति वाटत असे. अशा रीतीनें दिवस चालले असतां एकदां एका कुशल चित्रकारानें राजा व राणी यांचीं दोन भव्य चित्रें रेखाटलीं व तीं राजाला भेट म्हणून दिलीं. तीं चित्रें इतकीं कलापूर्ण होतीं कीं, प्रत्यक्ष राजा व राणीच तेथें असल्याचा भास होई. राजानें खूष होऊन चित्रकाराला मोठें बक्षीस दिलें व तीं चित्रें त्यानें आपल्या महालांत लावण्याची आज्ञा दिली. एकदां राजाच्या भेटीसाठीं वररुचि त्या महालांत आला. त्या वेळीं राजा कांहीं कामासाठीं दुसरीकडे गेला होता. वररुचि तीं चित्रें निरखून पाहूं लागला. राणीच्या एकंदर गुणांवरून व रूपावरून ती सर्व-लक्षण-संपन्न असली पाहिजे अशी त्याची खात्री झाली. अशा व्यक्तींच्या पोटावर तीळ असतो हें त्याला लक्षण-शास्त्रावरून माहीत होतें. म्हणून जातां जातां त्यानें चित्रांत राणीच्या पोटावर बारीकसा तीळ काढला. नंतर थोडा वेळ राजाची वाट पाहून तो निघून गेला.

थोड्या वेळानें राजा आपल्या महालांत आला. त्याचें लक्ष राणीच्या चित्राकडे गेलें. त्या चित्रांतील तो नवीन बदल राजाच्या ताबडतोब लक्षांत आला. त्यानें त्याबद्दल लागलीच चौकशी केली. वररुचीनें तो तीळ काढला असें समजल्यावर राजाच्या अंगाचा तिळपापड झाला. राणीच्या शरिरावरील तीळ वररुचीला कसा माहीत झाला या विचारानें तो वररुचीबद्दल शंका घेऊं लागला. अंतःपुरांत कांहीं पुरुष स्त्रीवेषांत वावरत होते, हें वररुचीनेंच राजाला सांगि-तलें होतें. त्यामुळें वररुचीचें अंतःपुरांत नेहमीं जाणें येणें असलें पाहिजे अशी राजाची खात्री पटली. राजाला संशयानें पुरेपूर पछाडलें. रागानें

त्याचा जळफळाट होऊं लागला. वररुचि आपला हितकर मित्र आहे, ही गोष्ट तो सर्वस्वीं विसरून गेला. त्यानें शकटालास बोलावून घेतलें व कांहींहि कारण न सांगतां वररुचीचा शिरच्छेद करण्याची आज्ञा दिली.

● ● ●

## शकटालाची कृतज्ञता

तें ऐकून शकटाल अगदी गोंधळून गेला. दिव्यबुद्धि असलेल्या व स्वतःला जीवदान देणाऱ्या वररुचीला ठार करणें त्याच्या जिवावर आलें. कांहींहि करून वररुचीला जिवंत ठेवायचें असं त्यानें मनांत ठरविलें. शकटालानें वररुचीची भेट घेतली व राजाची आज्ञा त्याच्या कानीं घातली. नंतर तो विनवणीच्या स्वरांत वररुचीला म्हणाला, " महाराज ! आपण माझ्याच घरीं एका भुयारांत गुप्तपणें राहावें. त्या ठिकाणीं असतां कोणालाहि संशय येणार नाहीं व तेथें आपल्या केंसालाहि धक्का लागणार नाहीं. एखाद्या अपराध्याचा अंधारांत शिरच्छेद करून, आपलाच शिरच्छेद केला असें मी जाहीर करतों. आपण माझ्यावर फार उपकार केले आहेत. तेव्हां माझ्या या विनंतीचा आपण स्वीकार करावा." तें ऐकून वररुचि त्याला म्हणाला, " तुम्ही कृतज्ञतेनें माझ्याबद्दल आपुलकी दाखविली याबद्दल मी तुमचा फार आभारी आहें. पण मला माझ्या इच्छेविरुद्ध कोणीहि मारूं शकणार नाहीं, ही गोष्ट तुम्ही नक्की लक्षांत ठेवा. कारण एक राक्षस माझा मित्र आहे. त्याची आठवण काढायचा अवकाश कीं तो एकदम प्रकट होतो. मी सांगतलें तर सगळ्या जगालाहि तो गिळून टाकूं शकेल. या राक्षसा-करवीं योगनंदाला मी केव्हांच होता कीं नव्हता करून टाकला असता. पण कांहीं झालें तरी तो माझा मित्र आहे. त्याचें शरीर जरी शूद्राचें असलें तरी तो मूळचा ब्राह्मणच आहे. तेव्हां त्याला मारून मित्रहत्या व ब्रह्महत्या पदरीं घेण्यापेक्षां तुमच्या सांगण्याप्रमाणें मी गुप्त राहण्यास तयार आहें."

● ● ●

**राक्षस मित्र**

वररुचीची ही हकीकत ऐकून शकटालाची उत्कंठा अधिकच वाढली. तो राक्षस आपणास दाखविण्याची त्यानें वररुचीला आग्रहपूर्वक विनंति केली. तेव्हां वररुचि क्षणभर डोळे मिटून स्वस्थ बसला. तों काय! एक अक्राळविक्राळ व पर्वतासारखा प्रचंड राक्षस एकाएकीं तेथें येऊन हात जोडून उभा राहिला. त्याला पाहून शकटालाची भीतीनें गाळणच उडाली. वररुचीनें त्याला निघून जाण्याची खूण केल्यावर तो राक्षस आला तसा निघून गेला. आतां कुठें शकटालाच्या जिवांत जीव आला. वररुचि म्हणजे प्रचंड दैवी शक्ति असलेला, असामान्य बुद्धिमत्तेचा महापुरुष आहे अशी त्याची खात्री झाली व तो त्याच्याकडे अधिक आदरपूर्वक पाहूं लागला. "राक्षस आपला मित्र कसा झाला?" असें त्यानें वररुचीला विचारलें असतां वररुचि म्हणाला, "पूर्वी या नगरीचें रक्षण करणारा एक कोतवाल नगरींतून फेरफटका करण्यासाठीं गेला असतां बेपत्ता झाला. तेव्हां दुसरे दिवशीं दुसऱ्या एका कोतवालाकडे तें काम सोपविलें. सकाळीं पाहिलें तों त्याचाहि थांगपत्ता लागेना. तेव्हां नगरीच्या रक्षणाकरितां नव्या नव्या अधिकाऱ्यांची नेमणूक केली. पण रात्रीं नगरींत फेरफटका करण्यासाठीं गेलेला अधिकारी हटकून बेपत्ता होत असल्याचें दिसून येई. पुढें तें काम करण्यास कोणीच तयार होईना.शेवटीं राजानें ती कामगिरी माझ्यावर सोंपविली. मी रात्रीं नगरींतून भटकत असतांना एक राक्षस माझ्याकडे येतांना दिसला. तो आपल्याला आतां गिळंकृत करणार व इतर अधिकाऱ्यांप्रमाणें आपली गत होणार अशी माझी खात्री झाली. पण तो राक्षस म्हणाला, "माझ्या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर दिलेंस तर मी तुझा दास होऊन राहीन, नाहीं तर मात्र तुला खाऊन टाकीन." तें ऐकून मला थोडा धीर आला. राक्षसाच्या प्रश्नाचें योग्य उत्तर आपणांस देतां येईल अशी आशाहि वाटूं लागली. "विचार तुझा प्रश्न," असें मी थोड्या धिटाईनेंच म्हणालों. राक्षसानें

प्रश्न केला, " सांग पाहूं या नगरींत सर्वांत सुंदर स्त्री कोणती आहे तें." नगरींतील सर्व स्त्रियांची माहिती मला असणें शक्य नव्हतें. तेव्हां पुनः अडचण निर्माण झाली. पण थोडा विचार करून निर्भयपणें मी म्हणालों, " यांत काय कठीण आहे ? जी स्त्री ज्याला मनापासून आवडते, ती त्याला सर्वांत सुंदर वाटते. " हें ऐकून राक्षस म्हणाला, " मला निरुत्तर करणारा तूं एकटाच भेटलास. तुझ्या बुद्धिप्रभावानें तूं मला जिंकलें आहेस. पूर्वीं वचन दिल्याप्रमाणें मी आजपासून तुझा दास झालों आहें. तुला जरूर वाटेल त्या क्षणीं तूं माझी आठवण काढ, म्हणजे मी तुझ्या सेवेसाठीं हजर होईन " असें म्हणून तो राक्षस क्षणांत दिसेनासा झाला. ही गोष्ट ऐकून शकटालाला वररुचीच्या चातुर्याचें कौतुक वाटलें व त्याला त्यानें आपल्या घरीं नेऊन गुप्तपणें भुयारांत ठेवलें. लोकांत मात्र त्याचा शिरच्छेद केल्याचें जाहीर केलें.

प्रधानमंत्री म्हणून राज्यकारभार पाहणाऱ्या वररुचीला दुर्दैवानें भुयारांतील एका अंधारकोठडींत दिवस काढण्याची पाळी आली. एक एक दिवस म्हणजे त्याला वर्षासारखा वाटूं लागला. त्या अज्ञातवासाला तो अगदीं कंटाळून गेला होता. केव्हां एकदां यांतून आपली सुटका होते असें त्याला होऊन गेलें होतें. याच विचारांत सचिंतपणें तो डोक्याला हात लावून बसला असतां शकटाल त्याची विचारपूस करण्यासाठीं आला. वररुचीची ती चिंताग्रस्त मुद्रा पाहून शकटालाला फार वाईट वाटलें. पुराणांतील कांहीं गोष्टींचा दाखला देऊन 'हेहि दिवस निघून जातील' असें म्हणून त्यानें त्याला धीर दिला व तो पुढे म्हणाला, " महाराज ! आपण असे दुःखी-कष्टी होऊं नका. राजाला आपल्या कृत्याचा नक्की पश्चात्ताप होईल. त्यावेळीं आपली या अज्ञातवासांतून सुटका करण्याचा मी कसून प्रयत्न करीन. " असें आश्वासन देऊन शकटाल निघून गेला व राजाला पश्चात्ताप होण्याचा प्रसंग लवकरच आला.

**राजपुत्र वेडा बनला**

एकदां योगनंदाचा मुलगा हिरण्यगुप्त शिकारीसाठीं निबिड अरण्यांत एकटाच गेला होता. शिकारीच्या नादांत तो इतका दूर गेला कीं परत येतांना वाटेंतच सूर्यास्त झाला. अंधारांत रस्ता दिसणें कठिण होऊं लागलें. घोडा सारखा ठेचाळूं लागला. कोठें तरी वसतीला राहावें म्हटलें तर चिटपांखरूंहि तेथें त्याला दिसेना. काय करावें हें त्याला सुचेना. शेवटीं घोड्याला एका कुरणांत सोडून ती रात्र एका झाडावर काढायची असें त्यानें ठरविलें. चुकून माकून एखादें श्वापद आलेंच तर घोड्याला पळून जातां यावें म्हणून त्यानें आपला घोडा मोकळाच कुरणांत सोडला व तो स्वतः एका वडाच्या झाडावर मोठ्या फांदीचा आधार घेऊन विश्रांति घेत बसला.

थोड्याच वेळांत वाघानें पाठलाग केल्यामुळें भेदरून गेलेलें एक अस्वल, त्याच झाडावर सरसर चढूं लागलें. आतां आपली कांहीं धडगत नाहीं असें वाटून राजपुत्र चुळबूळ करूं लागला. तेव्हां तें अस्वल मनुष्यवाणीनें त्याला म्हणालें, " बाबारे ! घाबरूं नकोस. तूं आणि मी एकाच संकटामध्यें आहोंत. मीं तुला माझा मित्र मानला आहे. आपण दोघेहि ही रात्र या झाडावर काढूं. तुला झोप आली असेल तर तूं खुशाल झोप घे. तोंपर्यंत मी जागा राहीन व तुला जाग आल्यावर मग मी थोडा वेळ झोप घेईन." हे त्याचे शब्द ऐकून राजपुत्राला थोडा धीर आला. कांहीं वेळानें राजपुत्र झोपीं गेला व अस्वल जागें राहून पहारा करूं लागलें. तेव्हां खालीं असलेला सिंह म्हणाला, " अस्वला ! तूं या राजपुत्राला खालीं ढकलून दे म्हणजे मी तुला जीवदान देईन." तेव्हां अस्वल म्हणालें, " दुष्टा ! मी राजपुत्राला माझा मित्र मानला आहे. प्राण गेले तरी मी मित्राचा विश्वासघात करणार नाहीं." तेव्हां सिंह नाइलाजानें गप्प बसला. थोड्या वेळानें राजपुत्राला जाग आली व अस्वल झोपीं गेलें. तें पाहून सिंह राजपुत्राला म्हणाला, " राजपुत्रा ! तूं या अस्वलाला खालीं ढकलून

दे म्हणजे मी तुला जीवदान देईन." तें ऐकून सिंहाला खूष करण्यासाठीं, घाबरलेला राजपुत्र झोपलेल्या अस्वलाला खालीं ढकलणार, इतक्यांत अस्वलाला अचानक जाग आली. त्यानें राजपुत्राचा कावा ओळखला व "मित्राचा द्रोह करणाऱ्या तुला वेड लागेल" असा शाप दिला. सकाळच्या वेळीं वेडा झालेला हिरण्यगुप्त परत आलेला पाहून योगनंदाला अत्यंत दुःख झालें. त्या वेळीं त्याला वररुचीची आठवण झाली व 'या वेळीं वररुचि असता तर त्यानें माझ्या मुलाला बरा केला असता' असे पश्चात्तापाचे शब्द त्याच्या तोंडून बाहेर पडले.

• • •

## वररुचीची मुक्तता

वररुचीला राजासमोर आणण्यास ही अगदीं योग्य संधि आहे असें वाटून शकटालानें राजाकडून प्रथम अभय मागितलें व नंतर वररुचि जिवंत असल्याचें राजाला सांगितलें. राजानें वररुचीला लागलीच क्षमा केल्याचें जाहीर केलें व त्याला सन्मानपूर्वक बोलावून घेतलें. हिरण्यगुप्ताच्या बाबतींत काय उपाय योजायचे याची राजानें वररुचीकडे विचारपूस केली. वररुचीनें क्षणभर सरस्वतीचें ध्यान केलें. त्याच क्षणीं सरस्वतीदेवीनें त्याला दर्शन देऊन राजपुत्राच्या वेडाचें कारण सांगितलें व त्याचें वेड कांहीं काळच टिकेल असें ती म्हणाली.

वररुचीनें अरण्यांत रात्रीं घडलेली सर्व हकिकत राजाला सांगितली व राजपुत्राच्या वेडाचें कारण काय याची त्याला स्पष्ट कल्पना दिली. "तुला हें कसें समजलें" असें राजानें त्याला विचारलें असतां तो म्हणाला, "महाराज! बुद्धिवान् लोक केवळ तर्कानें आणि कल्पनेनें न पाहिलेल्या अनेक गोष्टी जाणूं शकतात. ज्या कल्पनाशक्तीनें अन्तःपुरांत स्त्रीवेषानें संचार करणारे पुरुष व राणीच्या शरिरावरील तीळ मीं ओळखला, त्याच कल्पनाशक्तीनें मीं हें सर्व ओळखलें." वररुचीचें हें उत्तर ऐकून राजानें

ओशाळून शरमेनें मान खालीं घातली. त्याला आपल्या वर्तनाची लाज वाटूं लागली. त्यानें वररुचीचा मोठा सन्मान करण्याचें ठरविलें. पण वररुचीला मानसन्मानाची इच्छा राहिली नव्हती. खोट्या आरोपांतून आपली मुक्तता झाली या गोष्टीनेंच त्याला समाधान झालें. तो सर्वांचा निरोप घेऊन घरीं आला.

● ● ●

**वररुचीला वैराग्य आलें**

बऱ्याच दिवसांनंतर आपण आपल्या प्रेमळ मातेला व प्रिय पत्नीला भेटणार या विचारानें त्याचें मन उत्कंठित झालें होतें. तो घरीं आला. तों काय ! घर पुष्कळ दिवसांपासून बंद असावें असें दिसत होतें. त्यानें शेजारीं पाजारीं जाऊन चौकशी केली. त्याला पाहून ते गोंधळून गेल्यासारखे दिसत व खालीं मान घालून स्वस्थ बसत. शेवटीं तो सासुरवाडीस गेला. त्याचा सासरा उपवर्षहि त्याला पाहून गोंधळांत पडला. शेवटीं वररुचीनें चौकशी केल्यावर तो म्हणाला, “ राजानें तुम्हांला ठार केलें ही बातमी ऐकून उपकोशेनें आपला देह अग्नींत टाकला व आपल्या मातेचें अंतःकरण शोकानें विदीर्ण झालें. त्यांनींहि लवकरच इहलोक सोडला. पण आपण जिवंत कसे ? ” हा प्रश्न ऐकून वररुचीनें आपली हकीगत थोडक्यांत सांगितली. पण वररुचीला शोक इतका अनावर झाला कीं, त्यामुळ त्याला मूर्च्छा आली. उपवर्षानें त्याला शुद्धीवर आणल. तरीहि तो वेड्यासारखाच वरळूं लागला. तेव्हां वर्षाचार्यांनीं त्याला संसाराची असारता पटवून दिली. शेवटीं संसाराचा वीट येऊन तो तपश्चर्या करण्यासाठीं विंध्यारण्यांत निघून गेला.

● ● ●

**योगनंदाचा शेवट**

कांहीं दिवस निघून गेल्यावर, अयोध्येहून त्या तपोवनांत आलेला

एक ब्राह्मण वररुचीला भेटला. एकमेकांची विचारपूस झाल्यावर वररुचीनें त्याला योगनंदाबद्दल माहिती विचारली. तेव्हां तो म्हणाला, " महाराज ! एकदा चाणक्य नांवाचा एक ब्राह्मण प्रवासास चालला होता. वाटेंत तीक्ष्ण दर्भ टोचल्यानें त्याच्या पायांतून भळभळां रक्त वाहूं लागलें. तेव्हां रागारागानें तो दर्भ समूळ उखडून काढण्याचा त्यानें निश्चय केला व त्यासाठीं तो जमीन खणूं लागला. ही गोष्ट शकटालाला समजली. तेव्हां राजाचा वध करण्यासाठीं हा ब्राह्मण अगदीं योग्य आहे असें त्याला वाटलें. त्यानें चाणक्याला राजाच्या घरीं श्राद्धाला बोलाविलें. चाणक्य आला व तो पहिल्या पानावर जाऊन बसला. राजानें त्याला तेथून उठविलें तेव्हां चाणक्य रागानें थरथर कापूं लागला. त्याचे डोळे निखाऱ्या-प्रमाणें लाल झाले. आतां हा आपल्या दृष्टीनें राजाला जाळून टाकतो कीं काय असें वाटत होतें. सर्वांदेखत त्यानें आपल्या शेंडीची गांठ सोडली व प्रतिज्ञा केली, " सात दिवसांच्या आंत मी नंदराजाला जगांतून नाहींसा करीन व नंतरच माझ्या शेंडीची गांठ बांधीन ". 'वेडा कांहीं तरी बरळत आहे ' असें राजाला वाटलें. कुचेष्टेनें त्याला तो हंसला. पण शकटालानें कुणाला नकळत त्याला आपल्या घरीं आश्रय दिला. चाण-क्यानें सहा दिवस सतत मंत्र जपले व त्या भयंकर मंत्रांचा परिणाम म्हणून योगनंदाला सडकून ताप भरला. सातव्या दिवशीं राजा त्या तापामुळें मरण पावला. शकटालानें हिरण्यगुप्त राजपुत्रालाहि यमसदनाला पाठविलें व राजवंशांतील चंद्रगुप्त नांवाच्या एका मुलाला राज्यावर बस-विलें. शकटा राजकारणाला अगदीं कंटाळून गेला होता. चाणक्याला चंद्रगुप्ताचें मंत्रिपद त्यानें स्वीकारायला लावलें व सर्व गोष्टींना कंटाळून राहिलेलें आयुष्य तपश्चर्येंत घालविण्यासाठीं तोहि अरण्यांत निघून गेला.

● ● ●

**वररुचीला मुक्ति**

राजाचा अशा तऱ्हेनें शेवट झालेला ऐकून वररुचीला अत्यंत दुःख झालें. तो अधिकच विरक्त झाला. मनाची विषण्णता घालविण्या-साठीं तो विंध्यवासिनी देवीचें दर्शन घेण्यासाठीं गेला. तेथें काण-भूति नांवाचें एक पिशाच त्याला दिसलें. पूर्वजन्मींचा तो एक यक्ष होता व कुबेराच्या शापामुळें तो पिशाचयोनींत जन्माला आला होता. त्याला पाहून वररुचीला आपल्या पूर्वजन्मींचें स्मरण झालें. शंकरांनीं पार्वतीला एकान्तांत सांगतलेली दिव्य कहाणी त्यानें काणभूतीला सांगितली व तो म्हणाला, " माझा मित्र माल्यवान् हाहि देवीच्या शापानें 'गुणाढ्य' म्हणून पृथ्वीवर जन्माला आला आहे. त्याला तूं ही गोष्ट सांग म्हणजे तुम्हां दोघांचीहि शापांतून मुक्तता होईल." काणभूतीला अशी विनंति करून वररुचि मोक्षप्राप्तीसाठीं बदरिकाश्रमांत आला. अत्यंत भक्तिभावानें तो देवीला शरण गेला. त्यानें तिची उपासना सुरू केली. प्रसन्न होऊन देवीनें त्याला मोक्षाचा उपाय सुचविला. देवीच्या सांगण्याप्रमाणें वररुचीनें समाधि लावली व नंतर मंत्रोच्चार करीत त्यानें अग्निकुंडांत आत्माहुति दिली. अशा प्रकारें वररुचीला शेवटीं दिव्यगति प्राप्त झाली.

IRBK-0106278

१. रघुवंश
२. शाकुन्तल
३. विक्रमोर्वशीय
४. मृच्छकटिक
५. प्रतिमा
६. महावीरचरित
७. उत्तररामचरित
८. मालतीमाधव
९. स्वप्नवासवदत्ता
१०. दशकुमारचरित ( १ )
११. दशकुमारचरित ( २ )
१२. वेणीसंहार
१३. कुमारसम्भव
१४. मालविकाग्निमित्र
१५. हर्षचरित
१६. नागानंद
१७. पंचरात्र
१८. रत्नावली
१९. कादम्बरी
२०. मेघदूत
२१. शिशुपालवध
२२. किरातार्जुनीय
२३. बुद्धचरित
२४. मुद्राराक्षस
२५. प्रतिज्ञायौगंधरायण
२६. अविमारक
२७. अभिषेक
२८. मध्यमव्यायोग
२९. कर्णभार
३०. ऊरुभङ्ग
३१. पार्वतीपरिणय
३२. नलोदय-नैषध

श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री

# संस्कृत साहित्य सरिता

श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री

कालिदासाचें 'शाकुन्तल', शूद्रकाचें 'मृच्छकटिक' किंवा बाणाची 'कादम्बरी' हीं सामान्य मराठी वाचकाच्या दृष्टीनें केवळ ऐकलेलीं नांवें असतात; परंतु त्या नांवांच्या पुस्तकांत काय लिहिलेलें आहे हें थोडक्यांत, सोप्या भाषेंत, चटकन् समजलें तर किती बहार होईल !

❖ ❖ ❖

विद्यार्थी, नवशिक्षित, अल्पशिक्षित व सामान्य वाचक-वर्ग यांसाठीं

❖ ❖ ❖

सर्व प्रसिद्ध संस्कृत वाङ्मय मराठींतून गोष्टीरूपानें; प्रत्येक काव्य-नाटकाचें वेगवेगळें पुस्तक. ३२ पानाचें एक पुस्तक : प्रत्येकीं ६ आणे. पुठ्ठ्याच्या मजबूत पेटींतून विविध रंगी बत्तीस पुस्तकें एकत्र संच : १२ रुपये.

★

वोरा ॲण्ड कंपनी, पब्लिशर्स प्रायव्हेट लि.
३ राउंड बिल्डिंग, काळबादेवी रस्ता, मुंबई २.

# महामति वररुचि

22822
809


प. शं. जोशी

ना. क्र. ६२७८




IRBK-0106278

५० नये पैसे

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड,
३, राउंड बिल्डिंग, काळबादेवी रस्ता, मुंबई २